MHPU330026302025

दाखल दिनांक - १७/१२/२०२५
नोंदणी दिनांक - १७/१२/२०२५
निकाल दिनांक - ११/०८/२०२६
कालावधी - ०वर्षे, ०७महिने, २४दिवस

## मा. विशेष न्यायाधीश (पोक्सो), जुन्नर, जि.पुणे यांचे न्यायालयात

## (पिठासिन अधिकारी श्री. एस. बी. शेलार यांचेसमोर)

विशेष खटला क्र. ३०७/ २०२५
न्यायनिर्णय नि.३०

MHPU33-002630-2025

**'अ' विभाग**

| प्रथम खबरी अहवाल माहिती/ गुन्हा आणि पोलीस ठाणे | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र, ओतुर पोलीस ठाणे, ता.जुन्नर, जि.पुणे<br>गु. र. क्र. २००/२०२४ |
| तक्रारदार / फिर्यादी | **पिडीता**<br>रा. ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे |
| अभियोगपक्षातर्फे | अतिरिक्त सरकारी अभियोक्ता<br>श्री. जी. के. खोडे |
| आरोपी | **तुषार कान्हु मुंडे**<br>वय – २१ वर्षे, व्यवसाय – शिक्षण<br>रा.बारव, ता.जुन्नर, जि.पुणे |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | श्री.बी.एस.सिनलकर |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | जानेवारी २०२२ ते १७.०५. २०२४ |
| प्रथम खबरी अहवाल | १८.०५.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल | १७.१२.२०२५ |
| दोषारोप निश्चीत | १७.०६.२०२६ |
| पुराव्याची सुरुवात | २७.०७.२०२६ |
| आरोपीचा कलम ३१३ फौ.प्र.संहिता प्रमाणे जबाब | ---- |
| युक्तीवाद | ११.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | ११.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित | ११.०८.२०२६ |
| आरोपीच्या शिक्षेबाबत---- | लागू नाही. |

/ 138

## आरोपीचा तपशील

| अ.क्र. | आरोपींचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप निश्चीत तारीख | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली? | अटक झाल्यापासून न्यायनिर्णयापर्यंत आरोपी कारागृहात होता का? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुषार कान्हु मुंडे | १२.१२.२०२५ | —— | १७.०६.२०२६ | दोषमुक्त केले. | लागु नाही. | लागु नाही. |

| आरोपीतर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
| -- | -- | -- |

| न्यायालयातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
| -- | -- | -- |

## (अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे निशाणी दिलेल्याची यादी )

**'अ' — अभियोगपक्षातर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | २०/सा.क्र.१ | फिर्यादीवरील सही |
| २. | २१/सा.क्र.१ | प्रथम खबरी अहवालावरील सही |
| ३. | २५/सा.क्र.३ | तपास करण्याबाबत तपासी अधिका—यांना आदेश |
| ४. | २६ व २७/सा.क्र.३ | फिर्यादीमधील अधोरेखांकित भाग अ व ब |
| ५. | २८/सा.क्र.३ | पिडीतेच्या वडिलांच्या जबाबामधील अधोरेखांकित भाग अ |

**'ब' — आरोपीतर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | २३ | घटनास्थळ पंचनामा (आरोपीतर्फे मान्य) |
| २. | २६ | पिडीतेचा शाळा सोडल्याचा दाखला |

**'क' — न्यायालयातर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**'ड' — महत्वाचे पुरावे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|

138

| | नाही | नाही |
|---|---|---|

## न्यायनिर्णय

## (जाहिर दिनांक ११ ऑगस्ट, २०२६)

आरोपी विरूद्ध भारतीय दंड विधान कलम ३५४, ३५४ड, ३४१, व ५०६ आणि लैंगिक अपराधांपासुन बालकांचे सरंक्षण कायदा कलम ८ व १२ अन्वये खटला चालवण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. पिडीता व आरोपी यांची इन्स्टाग्राम ॲपद्वारे ओळख झाली. त्यानंतर जानेवारी २०२२ मध्ये पिडीता ही शाळेत जात असताना आरोपी तिचा पाठलाग करत असे. त्यावेळी पिडीतेने त्याला तसे न करण्यास सांगितले होते. परंतु आरोपी तिला मैत्री करायची आहे व त्याला तिच्यासोबत लग्न करायचे आहे असे सांगत असे. त्यानंतर त्याने एक दिवशी पिडीतेचा पाठलाग करुन व तिचा हात पकडून मोटारसायकलवर बसण्यास सांगितले. त्यामुळे आरोपीने तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. सदर प्रकार तिने कोणालाही सांगितला नाही.

दि.१७.०५.२०२४ रोजी आरोपीने पिडीतेच्या भावाच्या मोबाईलवर फोन करुन तिच्या वडिलांचा मोबाईल क्रमांक मागितला. त्यानंतर पिडीतेने आरोपीने तिच्यासोबत केलेल्या गैरवर्तनाबाबत तिचे वडिलांना व घरातील इतर सदस्यांना सांगितले. त्यानंतर पिडीतेने आरोपीविरुध्द ओतुर पोलीस ठाण्यात रितसर फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरून पोलीसांनी आरोपी बिरूद्ध गुन्हा र. क्र. २००/२०२४ दाखल केला. तपासी अधिकारी श्री.वाय.एस.जाधव(सा.क्र.३) यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला आणि आरोपीला अटक केली. तसेच इतर कागदोपत्री पुरावा गोळा करून तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. निशाणी — १५ अन्वये आरोपी विरूद्ध आरोप निश्चित करण्यात

आले आणि सदर आरोप त्यास वाचून दाखविण्यात आला असता त्याने आरोप अमान्य असल्याचे सांगितले आणि खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता तीन साक्षीदार तपासले. परंतु सदर साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यामध्ये आरोपीविरुध्द कोणतीही बाब आढळून न आल्याने आरोपीचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणेचा जबाब नोंदविण्यात आला नाही.

६. अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. जी. के. खांडे यांनी युक्तीवाद केला. आरोपीतर्फे श्री. बी.एस.सिनलकर यांनी युक्तीवाद केला. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेला लेखी व तोंडी पुरावा हा फौजदारी नियमावलीच्या भाग सहा च्या परिच्छेद ४४ (३) नुसार प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या भाग 'क' मध्ये नमुद करण्यात आलेला आहे.

७. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तिवाद केला की अभियोगपक्षातर्फे पिडीता (सा.क्र.१) व पिडीतेचे वडील (सा.क्र.२) यांना साक्षीदार म्हणून तपासण्यात आले असून त्यांनी अभियोगपक्षाच्या केसप्रमाणे उत्तरे दिली नाहीत. सा.क्र.३ श्री. जाधव (तपासी अधिकारी) यांनी आपण केलेल्या तपासाबाबत साक्ष दिलेली आहे. त्यांनी आरोपीला ओळखलेले आहे. तसेच फिर्याद व साक्षीदारांचे जबाब त्यांचे सांगण्यानुसार नोंदविल्याचे आपल्या साक्षीदरम्यान सांगितलेले आहे. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, तपासी अधिकारी (सा.क्र.३) यांनी सक्षम पुरावा देउन आरोपीविरुध्द सगळे गुन्हे सिध्द केलेले आहेत. त्यामुळे पोक्सो कलम २९ प्रमाणे गृहीतक वापरुन आरोपीला शिक्षा करण्यात यावी. आरोपीचे वकील श्री. जाधव यांनी असा युक्तिवाद केला की, अभियोगपक्षाने केस सिध्द केलेली नाही. साक्षीदार क्र. १ पिडीता व सा.क्र.२ पिडीतेच वडील यांनी अभियोग पक्षास अनुसरून उत्तरे दिलेली नाहीत. केस मध्ये इतर कोणी प्रत्य क्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाहीत. त्यामुळे त्यांची साक्ष ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे कोणतेही गुन्हे सिध्द होत नाहीत. सबब आरोपीला केस मधून निर्दोष सोडण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली.

८. खटल्याच्या निवाड्याकरीता पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन असून, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसे सहित खालीलप्रमाणे मी नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने अज्ञान पिडीत मुलीवर व फिर्यादीवर फौजदारीपात्र बलप्रयोग करुन त्यांचा विनयभंग केला? | नाही. |
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने अज्ञान पिडीत मुलीस संपर्क करण्याच्या उद्देशाने पाठलाग केला? | नाही. |
| ३. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने पिडीतेस गैरपणे निरुध्द केले? | नाही. |
| ४. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने पिडीतेस फौजदारीपात्र धाकदपटशा केला? | नाही. |
| ५. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने अज्ञान पिडीत मुलीवर लैंगिक हल्ला केला? | नाही. |
| ६. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने अज्ञान पिडीत मुलीवर लैंगिक अत्याचार केला? | नाही. |
| ७. | आदेश काय? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

138

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ७ करिता —**

९. मुद्दा क्र. १ ते ७ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे विवेचनासाठी व सोयीसाठी एकत्रीतरित्या व एकाच वेळेस चर्चेकरिता घेण्यात येत आहेत. आरोपीने घ टनास्थळ पंचनामा व पिडीतेचा शाळा सोडल्याचा दाखला हे सुध्दा मान्य केलेले आहेत.

१०. साक्षीदार क्र. १ पिडीता हिने तिच्या पुराव्यात सन २०२२ मध्ये ती तिचे पालकांसोबत ओतूर येथे रहात असल्याबाबत सांगितले आहे. तसेच त्यावेळी ती १०वी मध्ये शिकत असल्याबाबत सांगितले आहे. तसेच त्यावेळी ती कोणताही सोशल मिडीया अकाउंट वापरत नसल्याबाबत सांगितले आहे. तसेच सन २०२२ मध्ये ती इन्स्टाग्राम वापरत असल्याचे नाकारले आहे. तसेच आरोपीने तिला फ्रेंड रिक्वेस्ट पाठविली नसल्याबाबत सांगितले आहे. तसेच तिने आरोपीसोबत कोणतेही छायाचित्र

शेअर केले नसल्याचे सांगितले आहे. तिने तिच्या फिर्यादीमधील व प्रथम खबरी अहवालावरील सहया फकत ओळखल्या आहेत व त्यातील मजकुर अमान्य केला आहे.

११. साक्षीदार क्र. २ पिडीतेचे वडील यांच्या पुराव्यात त्यांनी ते २०२२ साली त्यांच्या पत्नी व मुलांसह ओतूर येथे रहात असल्याबाबत सांगितले आहे. तसेच घ टनेच्या वेळी पिडीता १० वी ला शिकत असल्याबाबत सांगितले आहे. त्यावेळी ती कोणतेही सोशल मिडीया अकाउंट वापरत नसल्याबाबत सांगितले आहे. तसेच आरोपीने तिला फ्रेंड रिक्वेस्ट पाठविली नसल्याबाबत सांगितले आहे. तसेच तिने आरोपीसोबत कोणतेही छायाचित्र शेअर केले नसल्याचे सांगितले आहे.

१२. साक्षीदार क्र. ३ श्री.जाधव हे गुन्हयाचे तपासी अधिकारी असून त्यांनी त्यांचे साक्षीपुराव्यादरम्यान त्यांनी केलेल्या तपासाबाबत सांगितले आहे. त्यांचे तपासादरम्यान आरोपीविरुध्द सबळ पुरावे आढळून आल्याने त्यांनी त्याचे विरुध्द दोषारोपपत्र दाखल केल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच फिर्यादीमधील अधोरेखांकित भाग अ व ब (नि.२६ व २७) व पिडीते वडिलांच्या जबाबामधील अधारेखांकित भाग अ (नि.२८) हा त्यांच्या सांगण्याप्रमाणेच नोंदविलेला असल्याचे कथन त्यांनी केले आहे.

१३. सदर केसमध्ये साक्षीदार क्र. १ व २ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी फिर्याद व प्रथम खबरी अहवालाप्रमाणे घटनेबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे झालेली घटना व आरोपीविरुध्द दोष सिध्द करण्यामध्ये सरकारपक्षास अपयश आलेले आहे. त्यामुळे कोणताही आरोप आरोपीविरुध्द सिध्द झालेला नाही व तो सदर केसमध्ये निर्दोष सुटण्यास पात्र आहे. सदर साक्षीदारांचा पुरावा हा अभियोगपक्षास कोणत्याही उपयोगाचा नाही. सदर साक्षीदारांनी केसबाबत किंवा आरोपीविरुध्द कोणताही संयुक्तीक पुरावा दिलेला नाही. त्यामुळे या साक्षीदारांच्या पुराव्याच्या आधारावर अभियोगपक्ष कोणतेही आरोप सिध्द करु शकलेला नाही.

१४. वरील साक्षीदारांव्यतिरिक्त अभियोगपक्षाने इतर कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या साक्षीदारांचा पुरावा अपूर्ण व विश्वासयोग्य वाटत नाही. आरोपीविरूध्दचा दोषारोप नि:संशयपणे शाबीत करण्याची जबाबदारी पूर्णत: अभियोगपक्षाची आहे. असे तत्व विशेषत: फौजदारी न्यायदान प्रक्रियेमध्ये स्थिरावलेले

आहे. प्रस्तुत प्रकरणी दाखल झालेला तोंडी व लेखी पुरावा बारकाईने पडताळला असता असे दिसून येते की, तसा निःसंशय शाबीतीचा पुरावा प्रस्तुत आरोपीविरूध्द याकामी दाखल झालेला नाही.

१५. साक्षीदारांच्या पुराव्याने व अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, अभियोगपक्ष आरोपीविरूध्द कोणताही आरोप सिध्द करू शकलेला नाही. अभियोग पक्षाचा पुरावा संशयास्पद वाटतो व त्यामुळे आरोपीविरूध्दचे गुन्हे सिध्द होत नाहीत. सदर केसमध्ये पिडीता हिने तिच्याविरुध्द कोणताही गुन्हा न झाल्याचा पुरावा न्यायालयासमक्ष दिलेला आहे. त्यामुळे तिला कोणतीही नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे तिला नुकसान भरपाई नाकारण्यात येत आहे. सदर केसमधील कोणताही जप्त मुददेमाल नाही. त्यामुळे मुददेमालासाठी कोणतेही आदेश पारित करण्यात येत नाहीत. वरील चर्चेचा निष्कर्ष असा की आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दे क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी नामे **तुषार कान्हु मुंडे** यास भारतीय दंडविधान कलम ३५४, ३५४ड, ३४१ व ५०६ आणि लैंगिक अपराधांपासुन बालकांचे सरंक्षण कायदा कलम ८ व १२ अन्वये च्या अपराधांमधून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २५८ (१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे आरोपीने त्याचा वैयक्तिक जात मुचलका ₹. २५,०००/– (अक्षरी रु.पंचवीस हजार) हजर करावा. |
| ४. | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४०६ प्रमाणे सदर न्यायनिवाडयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना पाठविण्यात यावी. |

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

दिनांक ११.०८.२०२६

(सु.भा.शेलार)
विशेष न्यायाधीश (पोक्सो), जुन्नर, जि.पुणे

## भाग 'क'

**(अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी )**

| अभियोपक्षातर्फे साक्षीदार | | | |
|---|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नाव | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
| १ | पिडीता | १९ | पिडीता |
| २ | पिडीतेचे वडील | २२ | साक्षीदार |
| ३ | श्री.वाय.एस.जाधव | २४ | तपासी अधिकारी |

दिनांक ११.०८.२०२६

(सु.भा.शेलार)
विशेष न्यायाधीश (पोक्सो), जुन्नर, जि.पुणे